भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# विदेशी व्यक्ती नोंदणी अधिनियम, १९३९

(१९३९ चा अधिनियम क्रमांक १६)

[१ जुलै, १९८० रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Registration of Foreigners Act, 1939

**(Act No. 16 of 1939)**

[*As in force on the 1st July, 1980*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले

१९८१

[किंमत ७० पैसे]

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. 'अनुकूलन आदेश, १९४८'.

२. 'विदेशी व्यक्ती नोंदणी (विशोधन) अधिनियम, १९४९' (१९४९ चा ३७).

३. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०'.

४. 'विदेशी व्यक्ती नोंदणी (विशोधन) अधिनियम, १९५७' (१९५७ चा ११).

(शा. म. मु.) प्र. दोन-अ-एच ४३१३ (५३०-१-८२)

# विदेशी व्यक्ती नोंदणी अधिनियम, १९३९

## कलमांचा क्रम


कलमे

१. संक्षिप्त नाव आणि विस्तार.

२. व्याख्या.

३. नियम करण्याची शक्ती.

४. शाबितीचा भार.

५. दंड.

६. अधिनियम लागू होण्यापासून सूट देण्याची शक्ती.

७. या अधिनियमाखाली कार्य करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.

८. इतर कायदे लागू होण्यास आडकाठी नसणे.

९. [निरसित.]

# विदेशी व्यक्ती नोंदणी अधिनियम, १९३९

## (१९३९ चा अधिनियम क्रमांक १६)

[८ एप्रिल, १९३९]

[१][भारतातील] विदेशी व्यक्तींची नोंदणी करण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम

ज्याअर्थी [१][भारतात] प्रवेश करणाऱ्या, तेथे उपस्थित असणाऱ्या आणि तेथून प्रयाण करणाऱ्या विदेशी व्यक्तींची नोंदणी करण्याचा उपबंध करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव आणि विस्तार.

१. (१) या अधिनियमास 'विदेशी व्यक्ती नोंदणी अधिनियम, १९३९' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [३]**** [२][संपूर्ण भारतभर] आहे.

व्याख्या.

२. या अधिनियमामध्ये,—

[४][(क) "विदेशी व्यक्ती" याचा अर्थ, भारतीय नागरिक नसलेली व्यक्ती असा आहे; ]

[५]* * * * *

(ख) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे.

नियम करण्याची शक्ती.

३. केंद्र शासनाला, अगोदर प्रसिद्धी देऊन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पुढीलपैकी कोणत्याही अथवा सर्व प्रयोजनांसाठी [६]नियम करता येतील, ती प्रयोजने अशी.—

(क) [७][भारतात] प्रवेश करणाऱ्या अथवा तेथे उपस्थित असणाऱ्या कोणत्याही विदेशी व्यक्तीने आपल्या उपस्थितीचे वृत्त विहित करण्यात येईल अशा कालावधीत व अशा रीतीने आणि अशा विहित तपशीलासह विहित प्राधिकरणास कळवणे ही गोष्ट आवश्यक करणे;

(ख) [७][भारतातील] एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणाऱ्या कोणत्याही विदेशी व्यक्तीने अशा इतर ठिकाणी तिचे आगमन झाल्यावर आपल्या उपस्थितीचे वृत्त विहित करण्यात येईल अशा कालावधीत व अशा रीतीने आणि अशा विहित तपशीलासह, विहित प्राधिकरणास कळवणे ही गोष्ट आवश्यक करणे;

(ग) [७][भारत] सोडून जाण्याच्या बेतात असलेल्या विदेशी व्यक्तीने आपल्या नियोजित प्रयाणाची तारीख विहित करण्यात येईल असा इतर तपशील विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणास विहित अशा प्रयाणपूर्व कालावधीत कळवणे ही गोष्ट आवश्यक करणे;

(घ) [७][भारतात] प्रवेश करणाऱ्या, तेथे उपस्थित असणाऱ्या अथवा तेथून बाहेर प्रयाण करणाऱ्या कोणत्याही विदेशी व्यक्तीने, विहित प्राधिकरणाकडून मागणी केली गेली असता, विहित करण्यात येईल अशा प्रकारचा आपली ओळख पटवणारा पुरावा सादर करणे ही गोष्ट आवश्यक करणे;

---

[१] १९४९ चा अधिनियम ३७—कलम २ द्वारे "भारताच्या प्रांतांमध्ये" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल केला.

[२] कित्ता—कलम ३ द्वारे, "भारताच्या सर्व प्रांतांमध्ये" या शब्दांऐवजी हा मजकूर दाखल केला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे समाविष्ट केलेला "हैद्राबाद राज्य वगळून" हा मजकूर १९५१ चा अधिनियम ३—कलम ३ व अनुसूचीद्वारे गाळला.

[४] पूर्वीच्या खंडाऐवजी हा खंड १९५७ चा अधिनियम ११—कलम ८ द्वारे दाखल केला. (१९ जानेवारी १९५७ रोजी व तेव्हापासून).

[५] अनुकूलन आदेश १९५० द्वारे समाविष्ट केलेला खंड (कक्) हा १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची याद्वारे गाळला.

[६] विदेशी व्यक्ती नोंदणी नियम, १९३९, यासाठी पहा — 'गॅझेट ऑफ इंडिया', १९३९, भाग एक, पृष्ठ १०५९.

[७] "प्रांतात" "प्रांतातील" "प्रांत" या शब्दांऐवजी अनुक्रमे "भारतात" "भारतातील" "भारत" हे शब्द १९४९ चा अधिनियम ३७— कलम ४ द्वारे दाखल केले.

(५) कोणतेही हॉटेल, भोजनालय, सराई अथवा तत्सम स्वरूपाची इतर कोणतीही वास्तू याची व्यवस्था पाहणाऱ्या कोणाही व्यक्तीने, कितीही काळ त्या ठिकाणी राहणाऱ्या विदेशी व्यक्तीचे नाव, विहित करण्यात येईल अशा कालावधीत व अशा रीतीने आणि अशा विहित तपशीलासह, विहित प्राधिकाऱ्याला कळवण्यास भाग पाडणे ही गोष्ट आवश्यक करणे ;

(च्) कोणत्याही जलयानाची अथवा वायुयानाची व्यवस्था पाहणाऱ्या अथवा त्याचे नियंत्रण करणाऱ्या कोणाही व्यक्तीकडे अशा जलयानातून अथवा वायुयानातून [१][भारतात] प्रवेश करणाऱ्या किंवा तेथून बाहेर जाऊ इच्छिणाऱ्या कोणाही विदेशी व्यक्तीसंबंधी विहित करण्यात येईल अशी माहिती विहित प्राधिकरणास सादर करणे आणि या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक होईल अथवा विहित करण्यात येईल अशा प्रकारचे सहाय्य अशा प्राधिकरणाला देणे ही गोष्ट आवश्यक करणे;

(छ) या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाला आवश्यक किंवा समयोचित वाटतील अशा इतर आनुषंगिक किंवा पूरक बाबींसंबंधी उपबंध करणे.

शाबितीचा भार.

४. हा अधिनियम अथवा तदन्वये करण्यात आलेला कोणताही नियम याच्या संदर्भात एखादी व्यक्ती ही विदेशी व्यक्ती आहे किंवा नाही अथवा ती व्यक्ती एखाद्या विशिष्ट वर्गाची किंवा वर्णनाची विदेशी व्यक्ती आहे किंवा नाही असा प्रश्न उद्‌भवल्यास, अशी व्यक्ती ही विदेशी व्यक्ती नाही अथवा अशा विशिष्ट वर्गाची किंवा वर्णनाची विदेशी व्यक्ती नाही हे शाबीत करण्याची जबाबदारी, 'भारतीय पुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १) यात काहीही अंतर्भूत असले तरीही, अशाच व्यक्तीवर राहील.

दंड.

५. जी कोणीही व्यक्ती या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमातील कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करील अथवा उल्लंघन करण्याचा प्रयत्न करील अथवा अनुपालन करण्यास चुकेल ती विदेशी व्यक्ती असेल तर, तिला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास, अथवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड, अथवा दोन्ही शिक्षा होतील, आणि ती विदेशी नसेल तर तिला पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड होईल.

अधिनियम लागू होण्यापासून सूट देण्याची शक्ती.

६. केंद्र शासनाला [२]आदेशाद्वारे असे घोषित करता येईल की, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांचे काही किंवा सर्व उपबंध एखाद्या विवक्षित विदेशी व्यक्तीला अथवा एखाद्या वर्गाच्या किंवा वर्णाच्या विदेशी व्यक्तीला लागू होणार नाहीत, अथवा उक्त आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा फेरफारांसह किंवा अशा शर्तीवर लागू होतील :

परंतु, असा प्रत्येक आदेश प्रस्थापित करण्यात आल्यावर होईल तितक्या लवकर त्याची एक प्रत [३][संसदेपुढे] ठेवण्यात येईल.

या अधिनियमाखाली कार्य करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.

७. या अधिनियमाखाली सद्‌भावपूर्वक करण्यात आलेल्या अथवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला अथवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

इतर कायदे लागू होण्यास आडकाठी नसणे.

८. या अधिनियमातील उपबंध हे 'विदेशी व्यक्ती अधिनियम, [४][१९४६]' (१९४६ चा ३१) आणि त्या त्या काळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यांच्या व्यतिरिक्त असतील, त्यास न्यूनकारी असणार नाहीत.

[५]९. [भाग ख राज्यांना अधिनियम लागू करणे.] (१९५१ चा ३)— कलम ३ व अनुसूचीद्वारे निरसित. भाग ख राज्ये (विधी) अधिनियम, १९५१.

---

१. १९४९ चा अधिनियम ३७–कलम ४ द्वारे "प्रांतात" याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. विदेशी व्यक्ती नोंदणी सूट आदेश, १९४९ यासाठी पहा — गॅझेट ऑफ इंडिया, १९४९, भाग एक, पृष्ठ १५९१.

३. 'संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे' या मजकुराऐवजी हा मजकूर अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे दाखल केला.

४. "१८६४" या ऐवजी हा आकडा १९४९ चा अधिनियम ३७—कलम ५ द्वारे दाखल केला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे जादा दाखल केले.

# THE REGISTRATION OF FOREIGNERS ACT, 1939

## विदेशी व्यक्ती नोंदणी अधिनियम, १९३९

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| aircraft | वायुयान | [S. 3(*f*)] |
| boarding-house | भोजनालय | [S. 3(*e*)] |
| depart | प्रयाण करणे | [S. 3(*d*)] |
| enter | प्रवेश करणे | [S. 3(*a*)] |
| leave | सोडून जाणे | [S. 3(*c*)] |
| prescribed authority | विहित प्राधिकरण | [S. 3(*b*)] |
| vessel | जलयान | [S. 3(*f*)] |

---

## विदेशी व्यक्ती नोंदणी अधिनियम, १९३९

## THE REGISTRATION OF FOREIGNERS ACT, 1939

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| भोजनालय | boarding-house | [S. 3(*e*)] |
| जलयान | vessel | [S. 3(*f*)] |
| प्रयाण करणे | depart | [S. 3(*d*)] |
| प्रवेश करणे | enter | [S. 3(*a*)] |
| वायुयान | aircraft | [S. 3(*f*)] |
| विहित प्राधिकरण | prescribed authority | [S. 3(*b*)] |
| सोडून जाणे | leave | [S. 3(*c*)] |

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई